

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२३-२४



दि.२९ ऑगस्ट२०२३

## 'मराठी वाङमय मंडळाचे उद्धाटन' व 'श्रावणसरी' कार्यक्रम
## 'राजर्षी' नियतकालिक प्रकाशन

## अहवाल

महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर. यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाङमय मंडळ उद्धाटन' व 'श्रावणसरी' कार्यक्रम दि.२९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सर्जेराव पद्माकर यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांनी अध्यक्षपद भूषविले. याप्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक यांनी काव्यवाचन व काव्यगायन केले. तसेच यावेळी मराठी विभागाच्या वतीने 'परिमल' भित्तीपत्रकाचा अंक प्रकाशित करण्यात आला. याचवेळी 'राजर्षी' या महाविद्यालयाच्या नियतकालिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विचारपिठावर सायन्स विभागाचे उपप्राचार्य प्रा.पी.एस.चौगुले, भूगोल विभागप्रमुख डॉ.एम.डी.कदम, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.महेश रणदिवे यांनी केले तर आभार श्री.अंकुश घुले यांनी व्यक्त केले.

### परिणाम/निष्पती

- विद्यार्थ्यांमध्ये वाङमयाविषयी आवड निर्माण होते.
- विद्यार्थी साहित्यलेखनास प्रवृत्त होतील.
- विद्यार्थ्यांना मराठी साहित्याविषयी ज्ञानात भर पडेल.

| लाभार्थी |
|---|
| ८२ |







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.